# निविदा सूचना

**विषय -:**झेरॉक्स मशीन (कॅनन मॉडेल IR ADV-४२२५) करीता सर्वसामावेशक दुरुस्ती व देखभाल वार्षिक सेवा संविदा दर करार करण्योबाबत.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, २ रा मजला, रु. नं.२२५ (विस्तार) मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ या विभागामध्ये कॅनन इंडिया लि. या कंपनीची झेरॉक्स मशीन (मॉडेल IR ADV - २२५) वापरात आहे. सदर डिजिटल फोटो कॉपीअर मशीनसाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी स्थानिक पुरवठादाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

या वार्षिक दरकराराकरीता खालील अटी व शर्ती लागू राहतील-:

१) संबंधित कंपनीने डिजिटल फोटो कॉपीअर मशीनकरीता चांगल्या दर्जाच्या साहित्याचा दरकराराच्या दिनांकापासून पुढील एक वर्षासाठी पुरवठा करणे बंधनकारक राहील असे १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रमाणपत्र देण्यात यावे.

२) विभागाने मागणी केल्यापासून २४ तासांत पुरवठादाराने साहित्य पुरविणे आवश्यक राहील व पुरविण्यात आलेल्या मालाची प्रतवारी व दर्जा हा योग्य नसल्याचे आढळून आल्यास सदर साहित्य परत पाठविण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू करार तात्काळ एकतर्फी संपूष्टात आणण्यात येऊन पुरवठादारास काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

३) निर्धारित केलेल्या एक वर्षाच्या कालावधीत डिजिटल फोटो कॉपीअर मशीनशी संबंधीत साहित्याच्या दरामध्ये कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे दरवाढ झाल्यास पुरवठादाराने दरपत्रकात सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करुन मिळणार नाही.

४) महिन्यातून किमान एकदा डिजिटल फोटो कॉपीअर मशीनची विनाशुल्क सर्व्हिसिंग करणे आवश्यक आहे.

५) प्लास्टिक तसेच इलेक्ट्रॉनिक सुटे भाग व इतर कंझ्यूमेबल सुटया भागांव्यतिरिक्त (उदा. टोनर कार्टेज) इतर कोणत्याही सुटया भागाकरीता शुल्क आकारता येणार नाही.

६) कॅनॉन कंपनी सोबत अधिकृत पुरवठादार करार केला असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

वरीलपैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास सदरहू करार कोणतीही पूर्व सूचना न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार शासनाकडे राहील. वरील अटी व शर्ती मान्य असल्यास संबंधित पुरवठादाराने दि.२८ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत नोंदणीशाखा, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, दुसरा माळा रुम नं.२२५, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, (विस्तार) मुंबई- ४०००३२ या पत्त्यावर मोहोरबंद पाकिटातून पाठवावे किंवा स्वत: आणून देण्यात यावे.

20/4/2022

(कृष्णकांत कदम)
अवर सचिवमहाराष्ट्र शासन ,